महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक - एचएमआर-१६२३/प्र.क्र.९३/२०२३/अठ्ठावीस दिनांक- ११ ऑगस्ट,२०२३

# :- प्रसिद्धीपत्रक -:

**विषय** :- सहायक सरकारी अभियोक्ता, गट-अ, गृह विभाग
**संदर्भ** :- जाहिरात क्रमांक ००१/२०२२

सहायक सरकारी अभियोक्ता गट-अ,गृह विभाग, या संवर्गाचा निकाल आयोगाच्या संकेत स्थळावर दिनांक १० ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण, मुंबई येथे श्रीमती हेमलता नागदेवे यांनी दाखल केलेल्या मूळ अर्ज क्रमांक ९३०/२०२३ या न्यायिक प्रकरणातील अंतरिम आदेशानुसार श्रीमती नागदेवे यांचे चाळणी परीक्षा व मुलाखतीचे गुण सर्वसाधारण गुणवत्ता यादीत प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

३. सदर पदाचा निकाल हा मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ७६६९/२०२३, रिट याचिका क्रमांक ३८६७/२०२३, तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ९३०/२०२३ या न्यायिक प्रकरणातील मा. न्यायालयाच्या/ न्यायाधिकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन जाहीर करण्यात येत आहे.

४. प्रस्तुत पदाच्या जाहिरातीमध्ये अनाथ प्रवर्गासाठी ०५ पदे आरक्षित होती. अनाथ प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्याने अनाथ प्रवर्गासाठी आरक्षित पाच पदांकरिता शिफारस करणे आयोगास शक्य झाले नाही.

५. प्रस्तुत पदाच्या जाहिरातीमध्ये दिव्यांग प्रवर्गाकरिता २२ पदे आरक्षित होती. त्यापैकी कर्णबधिरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता (D/HH) प्रवर्गासाठी ०५ पदे व स्वमग्नता(Autism)/ मंदबुद्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) प्रवर्गासाठी ०६ पदे अशा एकूण ११ पदांसाठी उमेदवार उपलब्ध न झाल्याने आयोगास शिफारस करणे शक्य झाले नाही.

ठिकाण :- नवी मुंबई
दिनांक ;- ११ ऑगस्ट,२०२३

उप सचिव (सरळ सेवा - निकाल)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग